# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 06/02/2024 (मंगळवार) सकाळ


## नागपूर ग्रामीणच्या अमित रमेश मसरकेने राज्य स्तरावरील ३४ वी महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा २०२४ स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले

नागपूर ग्रामीण पोलीस दलातील लांबउडी स्पर्धेत पोलीस अंमलदार अमित रमेश मसरके याने राज्य स्तरावरील ३४ वी महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा २०२४ या स्पर्धेमध्ये नागपूर ग्रामीणचे प्रतिनीधीत्व करून दिनांक ०४/०२/२०२४ ते दिनांक ०६/०२/२०२४ पर्यंत महाराष्ट्र पोलीस अॅकेडमी नाशिक येथे आयोजित झालेल्या ३४ वी महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या लांब उडी स्पर्धेत सुवर्ण पदक पटकावुन नागपूर ग्रामीणला गौरवांन्वीत केले. अमित याने ६.६३ मीटर लांबउडी मारून प्रथम क्रमांक प्राप्त केला. सुवर्णपदक पटकाविल्या बद्दल नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से) तसेच अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ यांनी अभिनंदन केले. तसेच अमित मसरके याला १० हजार रू. बक्षीस जाहीर केले आहे.

अमित हा नागपूर ग्रामीण पोलीस दलात कार्यरत आहे. त्याने नेहमीच पोलीस दलातील अतिशय व्यस्त व धावपळीचे आपले दैनंदिन कर्तव्य सांभाळुन आपला खेळण्याचा छंद कायम जोपासला आहे. खेळाप्रती त्याची मेहनत व जिद्द पाहुन नागपूर ग्रामीण पोलीस दलातील सर्वांना त्याचा सार्थ अभिमान वाटत आहे.



# अवैध्यरीत्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या दोन टीप्परवर उमरेड पोलीसांची कार्यवाही

दिनांक ०५/०२/२०२४ रोजी दुपारी १६/०० वा. दरम्यान उमरेड पोलीसांचे पथक पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असताना माहीती मिळाली की, काही टीप्पर रेती भरुन उमरेडकडे येत आहेत. अश्या विश्वसनीय माहीती वरून पोलीसांनी सापळा रचुन मांगरुळ फाटा येथे पीवळया रंगाचा टीप्पर क्र. एम. एच.– ४०/ बी.जी.– ९२१६ मध्ये ०५ ब्रास रेतीची अवैध्यरीत्या वाहतुक करताना मिळुन आल्याने एकुण १२,२५,०००/– रू.चा मुद्देमाल जप्त केला असुन सदर टीप्परचा चालक सुनील दयाराम गजभे, वय ३२ वर्ष, रा. मोहाळी तह. नागभीड जि. चंद्रपुर व टीप्परचा मालक अमोल दिलीप जांभुळकर वय ३४ वर्ष, रा. विर्ली तह उमरेड जि. नागपुर यांच्या विरूध्द पो.स्टे. उमरेड येथे अप. क्र. ४०/२०२४ कलम ३७९, १०९ भा.द.वी., सहकलम ४८ (७), ४८ (८) महा. जमीन महसुल अधिनीयम १९६६, सहकलम ४, २१ खाण आणि खनिज अधीनीयम १९५७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

तसेच एम.आय.डी.सी. परीसरात बी.पी.एड. कॉलेज येथे रात्री २३/०० वा. दरम्यान टीप्पर क्र. एम.एच. ४० सी. एस. ५८३४ मध्ये १० ब्रास रेतीची अवैध्यरीत्या वाहतुक करताना मिळुन आल्याने एकुण २६,४५,०००/– रू. असा मुद्देमाल जप्त केला असुन टीप्परचा चालक आशिष आडकुजी खोंडे, वय २९ वर्ष, रा. चांपा, रोशन उर्फ मोन्टु दिलीप कानतोडे, वय ३० वर्ष, रा. मांगली तह. उमरेड जि. नागपुर यांच्या विरूध्द पो.स्टे. उमरेड येथे अप. क्र. ४१/२०२४ कलम ३७९, १०९ भा.द.वी., सहकलम ४८ (७), ४८ (८) महा. जमीन महसुल अधिनीयम १९६६, सहकलम ४, २१ खाण आणि खनिज अधीनीयम १९५७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. दोन्ही गुन्ह्यातील आरोपींना अटक करुन त्यांना मा. न्यायालयात हजर करण्यात आले असुन पुढील तपास सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. राजा पवार उमरेड विभाग उमरेड जि. नागपुर ग्रा. यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. कुणाल रामटेके, पोलीस अमंलदार प्रदिप चवरे, राधेश्याम कांबळे, पंकज बट्टे, तुषार गजभीये, सर्व पोस्टे उमरेड यांनी यशस्विरीत्या पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर